# डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ६७ /२०२५ दि. ०८/०४/२०२५

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक १४/०४/२०२५ रोजी दुपारी १४:०० वाजेनंतर डोंबिवली पूर्व व पश्चिम परिसरातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विविध मंडळाचे वतीने मिरवणुका निघणार आहेत. सदर मिरवणुकी मध्ये विविध मंडळ, संस्था समाविष्ठ होवून नागरीक मोठया संख्येने उपस्थित राहतात. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) कल्याण रोड वरील घारडा सर्कल डोंबिवली पुर्व येथून टिळक चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **घारडा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने घारडा सर्कल ते टिळक चौक पर्यंत टिळक चौक ते घारडा सर्कल या मार्गिकेवरून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) घरडा सर्कल डोंबिवली पूर्व कडून टिळक चौक कडे येणाऱ्या के.डी.एम.टी, एन.एम.एम.टी, खाजगी बसेस व अवजड वाहनांना **घरडा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर खाजगी बसेस व अवजड वाहने घरडा सर्कल येथे यु टर्न घेवून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) डोंबिवली पश्चिम कडून कोपर ब्रिजवरून डोंबिवली पूर्व कडे जाणाऱ्या वाहनांना **कोपर ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने महात्मा फुले रोडने बावन चाळ, नवीन ठाकुर्ली ब्रिजवरून डावे वळण घेवून व्ही. पी. रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ४) डोंबिवली पुर्व येथील घारडा सर्कल येथून कल्याण रोडने टिळक चौक मार्गे पाटणकर चौक चार रस्ता येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **टिळक चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने उजवीकडे वळण घेवून टिळक रोडने स्व. इंदिरा गांधी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ५) मिरवणूक आर पी रोड, टिळक चौक येथे आले नंतर आर पी रोड गिरणार चौक, मानपाडा रोड, स्व. इंदिरा चौक, मानपाडा रोड संत नामदेव पथ येथून आर पी रोडने टिळक चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **चार रस्ता** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मिरवणूक चार रस्ता येथून मानपाडा रोड स्व. इंदिरा चौक येथे जाईपर्यंत संत नामदेव पथ मानपाडा रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ६) मिरवणूक चार रस्ता पाटणकर चौक येथे आलेनंतर मानपाडा रोड संत नामदेव पथ येथून मानपाडा रोडने स्व. इंदिरा गांधी चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **चार रस्ता** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मिरवणूक चार रस्ता येथून मानपाडा रोड स्व.इंदिरा गांधी चौक येथे जाईपर्यंत डावीकडे वळण घेवून आर पी रोडने शिवमंदिर रोड अथवा टंडन रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ७) मिरवणुक चार रस्ता पाटणकर चौक येथे आले नंतर आर पी रोड गिरणार चौक येथून मानपाडा रोडने स्व. इंदिरा गांधी चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **चार रस्ता** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मिरवणुक चार स्ता येथून मानपाडा रोड स्व. इंदिरा चौक येथे जाईपर्यंत सरळ आर पी रोडने टिळक चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ८) डोंबिवली पश्चिम येथील मोठागांव रेतीबंदर रोड येथून रेतीबंदर चौक मार्गे दिनदयाळ रोड सम्राट चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **रेतीबंदर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने सरळ जगन गायकवाड मार्गे उमेश नगर रोडने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ९) मिरवणुक ९० फिट रोड म्हसोबा चौक येथे आलेनंतर म्हसोबा चौक येथून जुने हनुमान मंदिर ठाकुर्ली टी पॉईंट येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **म्हसोबा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

CS CamScanner

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने मिरवणुक संपेपर्यंत ९० फिट रोडने खंबाळपाडा गाव, ९० फिट कॉर्नर येथून इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** **१०) मिरवणुक ९० फिट रोड म्हसोबा चौक येथे आलेनंतर ठाकुर्ली स्टेशन कडून जुने हनुमान मंदिर ठाकुर्ली टी पॉईंट येथे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना हनुमान मंदिर येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.**

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ठाकुर्ली, चोळेगांव हनुमान मंदिर कडून कै.फोशिबाई भोईर चौक अथवा बंदिश पॅलेस हॉटेल मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. १४/०४/२०२५ रोजी दुपारी १४:०० ते २३:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

<u>प्रति,</u>

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

<u>प्रत कार्यवाहीस्तव,</u>

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण

नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

<u>प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,</u>

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.

CamScanner